# नामकरणातून ४० कोटींचे उत्पन्न

## मेट्रो ३ मार्गिकेवरील पाच स्थानकांचे तीन कंपन्यांना अधिकार

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २१ : मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाद्वारे (एमएमआरसी) मेट्रो ३ मार्गिकेवरील पाच स्थानकांचे नाम अधिकार विविध नामांकित कंपन्यांना देण्यात आले आहेत. त्याद्वारे महामंडळाला वार्षिक ४० कोटी रुपयांचा नॉन-फेअर महसूल प्राप्त होणार आहे. मेट्रो-३ कार्यान्वित झाल्यानंतर पुढील पाच वर्षांमध्ये पाच टक्के वाढीसह सदर नाम अधिकाराद्वारे एकत्रितपणे २१६ कोटी रुपयांचे उत्पन्न महामंडळाला मिळणार आहे.



कोटक महिंद्रा बँककडे वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) स्थानक व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो स्थानकाचे अधिकार देण्यात आले आहेत; तर आयसीआयसीआय लोम्बार्डकडे सिद्धिविनायक मेट्रो स्थानकाचे अधिकार देण्यात आले. तसेच लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनकडे (एलआयसी) चर्चगेट आणि हुतात्मा चौक मेट्रो स्थानकांचे नाम अधिकार देण्यात आले आहेत. या अंतर्गत सदर कंपन्यांना ब्रँडिंगसाठी जागा मिळेल, तसेच ट्रेनच्या घोषणांमध्ये आणि स्थानकांच्या नकाशांमध्ये या कंपन्यांच्या नावाचा उल्लेख केला जाईल. सोबतच त्या कंपन्यांचे नाव संबंधित स्थानकाच्या नावाआधी जोडले जाणार आहे.

ऑक्टस ॲडव्हायझर्स-स्टुडिओ पीओडी कन्सोर्टियम हे या प्रक्रियेसाठी सल्लागार म्हणून काम बघत होते. उर्वरित स्थानकांचे नाम अधिकार निविदा मेट्रो-३ कार्यान्वित होण्याआधी आमंत्रित करण्याचे नियोजित आहे.

### तिकिटाचे शुल्क वाजवी राहण्यास मदत

नॉन-फेअर बॉक्स महसूलामुळे तिकिटाचे शुल्क वाजवी ठेवणे शक्य होईल. मेट्रो-३ स्थानकांद्वारे दरवर्षी प्रतिस्थानक सरासरी आठ कोटींचा महसूल प्राप्त होईल. ही किंमत सर्वाधिक उत्पन्न प्राप्त करणाऱ्या मेट्रो स्थानकांपैकी एक आहे. दुबई, माद्रिद, जकार्ता, क्वालालंपूर या मेट्रोंचे प्रति स्थानक वार्षिक सरासरी उत्पन्न १ दशलक्ष डॉलरपर्यंत आहे, असे एमएमआरसीच्या अश्विनी भिडे यांनी सांगितले.